# राज्य माहिती आयोग, मुख्यालय, मुंबई

माहितीचा अधिकार

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

**क्र.मुमाआ/नों.क्र.१०८५४/२१/अ.क्र.४३९८/२४/०१**

श्री. बिरेंद्र कुमार

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा मुख्य लिपिक, अतिरिक्त महापालिका आयुक्त,
प.उ. यांचे कार्यालय, महानगरपालिका मुख्यालय, विस्तारित इमारत,
२ रा मजला, महापालिका मार्ग, मुंबई – ४०० ००१.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.)
के/पूर्व, आझाद रोड, गुंदवली, अंधेरी (पू.), मुंबई – ४०० ०६९.

व्दितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २६/०४/२०२४

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपीलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १५/०६/२०२१ | १२/०७/२०२१ | २३/०७/२०२१ | ०२/०९/२०२१ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि.१७/०९/२०२१ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारींनी माहिती दिली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

अपिलार्थी यांनी त्यांचा अर्ज दि. १५/०६/२०२१ अन्वये ऑनलाईन तक्रार क्र.०७२२५९३११९, ०७२२५९३१५१ आणि ०७२२५९२३३४, ०७२२५९२४४०, ०७२२५९०६११ ( इ. व का.) यांना अग्रेषित केली होती. या तक्रारींवर दि.३१.०५.२०२१ ते १५.०६.२०२१ कालावधीत काय कारवाई केली याबाबत माहिती विचारलेली आहे.

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.) के/पूर्व श्री.प्रदिपकुमार पाठक यांनी अपिलकर्तांला तक्रारीची माहिती दिली आहे असे उत्तर दिले.

प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ. व का.) के/पूर्व श्री.सतीश पोवार यांनी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.) के/पूर्व यांनी माहिती अधिकार अर्जाचे सुधारित उत्तर द्यावे तसेच तक्रार अर्जावर काय कार्यवाही करण्यात आली ती माहिती १५ दिवसात कळवावी असे आदेश पारित केले.

आजच्या सुनावणीच्या वेळी अपिलकर्ता अनुपस्थित. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.) के/पूर्व श्री.कौशरखान पठाण आणि प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता (इ. व का.) के/पूर्व श्री.मंदार तारी उपस्थित.

सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.) के/पूर्व श्री.कौशरखान पठाण यांनी सूचित केले की, तत्कालिन जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.) के/पूर्व श्री.प्रदिपकुमार पाठक यांनी काही कार्यवाही केली नाही आणि ते आता सेवानिवृत्त आहेत.

अभिलेखावरुन दिसून येते की, संबंधित जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.) के/पूर्व यांनी अपिलकर्तांला दि.१२/०७/२०२१ रोजी उत्तर दिले. प्रथम अपिलीय अधिकारींनी सुनावणी घेतली जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.) के/पूर्व यांनी माहिती अधिकार अर्जचे सुधारित उत्तर द्यावे तसेच तक्रार अर्जावर काय कार्यवाही करण्यात आली ती माहिती १५ दिवसात कळवावी. परंतु जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता (इ. व का.) के/पूर्व श्री.प्रदिपकुमार पाठक यांनी काही कार्यवाही केली नाही.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग पुढील आदेश देत आहे:

**आदेश**

१. विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी आयोगाचे आदेश प्राप्तीच्या ३० दिवसात प्रथम अपिलीय अधिकारींच्या आदेशानुसार माहिती अपिलकर्तास नोंदणीकृत टपालाने विनामूल्य द्यावी.
२. अपिल निकाली काढण्यात येत आहे.

आदेश

( समीर सहाय )
राज्य मुख्य माहिती आयुक्त

मुंबई
दिनांक : २६-०४-२०२४

State Information Commission * Maharashtra *